# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**विद्यापीठ विभाग/संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्र पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२२—२३.**

**संदर्भ :** विद्यापीठ परिपत्रक संदर्भ क्र. शै. प्रवेश/६२७४ दि. २९/१२/२०२२.

कृपया वरील संदर्भीय परिपत्रकाचे अवलोकन करावे, ज्या अन्वये सन २०२२—२३ साठी पीएच्.डी. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी सुधारित सूचना निर्गमित करण्यात येतील असे कळविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने सदर प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यासाठी खालील प्रमाणे सुधारित सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. प्रवेशासाठी संबंधित मार्गदर्शकांकडे मान्य असलेल्या प्रवेशक्षमतेनुसार आरक्षण न ठरविता संबंधित विद्यापीठ विभाग व महाविद्यालयामधील संशोधन केंद्र येथे त्या त्या विषयासाठी कार्यरत असलेल्या मार्गदर्शकांकडे मान्य असलेली प्रवेशक्षमता एकत्रित विचारात घेऊन आरक्षण ठरविण्यात आलेले आहे.

२. अभ्यासक्रम प्रवेशासाठी आरक्षणासंदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन करावे.

३. प्रवर्गनिहाय एकुण आरक्षणाच्या टक्केवारीनुसार आरक्षणाची अंमलबजावणी करावी.

(OPEN-40%, EWS-10%, SC-13%, ST-7%, DT/NT-11%, OBC-19%, SBC-UPTO 2% from OBC category if OBC quota not fulfilled) तसेच अनाथ 1%व दिव्यांगांसाठी 5% समांतर आरक्षणाप्रमाणे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेऊन प्रक्रिया पूर्ण करावी.

४. सद्यस्थितीत पीएच.डी. संशोधक मार्गदर्शकाकडे कार्यरत असलेल्या प्रवर्गाचे विद्यार्थी विचारात घेऊन प्राधान्याने इतर प्रवर्गाचे विद्यार्थी विहित नियमानुसार द्यावेत.

५. आरक्षणानुसारच आरक्षित जागांवर त्या त्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची निवड करावी तसेच आरक्षण अदलाबदली करण्यात येऊ नये..

६. सर्व मान्यताप्राप्त संशोधन केंद्रांना विभागाच्या/महाविद्यालयाच्या BOD लॉगीन मध्ये संबंधित संशोधन केंद्रासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची अद्ययावत यादी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर यादीतील विद्यार्थ्यांना संशोधन केंद्रांनी त्याच्या स्तरावर ई—मेल, तसेच दुरध्वनीद्वारे तसेच संशोधन केंद्र महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर मुलाखतीच्या वेळापत्रकाबाबत माहिती प्रसिद्ध करावी.

७. BOD लॉगीनमध्ये उपलब्ध केलेल्या अद्ययावत यादीचा उपयोग करून कोणताही विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

८. मुलाखत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर BOD लॉगीनमध्ये उपलब्ध केलेल्या विहीत प्रपत्रात मुलाखत अहवाल Online तसेच Offline पद्धतीने सादर करावा.

९. संशोधक मार्गदर्शकांकडे विद्यार्थी वर्ग करताना विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या संशोधक मार्गदर्शकांसाठीच्या सुचनांचे तंतोतंत पालन करावे तसेच संशोधक विद्यार्थी व मार्गदर्शक यांची विषय विशेषता (specialization) लक्षात घेऊन समन्वयाने मार्गदर्शकांची नियुक्ती करावी.

१०. संशोधन केंद्रांनी निवड केलेल्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रता तपासून त्याची खात्री करावी.

पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया २०२२–२३ साठी नव्याने दिलेल्या विभागीय संशोधन समिती समोर आपल्या विभागामार्फत **दि. १५ फेब्रुवारी २०२३** पर्यंत मुलाखती घेण्यात याव्यात.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

संदर्भ क्र. शै.प्रवेश/455 )
दिनांक :20/०१/२०२३ )

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :–**

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य/संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे .